**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनी क्र.२२६९४९८४/८५,Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ८७ /सन २०१९-२०
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: १८/१२/२०१९

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **२७** वी बैठक दिनांक **०९/१२/२०१९** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतिवृत्तातील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन पाणथळ तक्रारींबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

## कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची २७ वी मासिक बैठक

### दि.०९/१२/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सदरची बैठक घेण्यात आली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी दौंड | विभागीय आयुक्त कोकण विभाग | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, बेलापूर, नवी मुंबई. |
| २ | श्री. सिध्दराम सालीमठ, | उप.आयुक्त (महसूल) कोकण विभाग | विभागीय आयुक्त कोकण विभाग |
| ३ | श्रीमती. निनु सोमराज | उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ४ | डॉ. दिलीप पांढरपट्टे | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | |
| | श्री. डी. एस. चाबुकस्वार | उप आयुक्त, नवी मुंबई मनपा | उप आयुक्त, नवी मुंबई मनपा |
| ५ | श्री. विनोद पुन्शी | प्रेसिडेंट | नवीमुंबई एन्व्हा. प्रीझ. सोसायटी |
| ६ | श्री. प्रमोद पाटिल | प्रतिनिधी | सिडको |
| ७ | श्री. इ. के. संख्ये | कार्यकारी अभियंता | एम.सी.जी.एम. |
| ८ | श्री. महेश इंगळे | अधिक्षक लॅन्ड रेकॉर्ड | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| ९ | श्री. दत्तात्रय नवले | उप विभागीय अधिकारी पनवेल | |
| १० | श्रीमती मनिषा प्रधान | प्रदुषण नियंत्रण अधिकारी | प्रदुषण नियंत्रण अधिकारी |
| ११ | श्री. रमाकांत भवर | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी, चिपळूण |
| १२ | श्री. जयंत बजबळे | सहा. पालीस आयुक्त ठाणे शहर | सहा. पालीस आयुक्त ठाणे शहर |
| १३ | श्री. संजय पाटील | सहयोगी नियोजक | एम.आय.डी.सी |
| १४ | श्री. जगदीश भारती | पोलीस उप निरीक्षक | पोलीस आयुक्त, नवी मुंबई |
| १५ | श्री. अनील गंभीरे | पोलीस निरीक्षक | पोलीस अधिक्षक, रत्नागिरी |
| १६ | श्रीमती सई वडके | विधी अधिकारी | मिरा-भाईंदर मनपा |
| १७ | श्रीमती सुलोचना कळंबे | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | पोलीस आयुक्त , मुंबई. |
| १८ | श्री.टी.जी. यादव | उप प्रादेशिक अधिकारी | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ |
| १९ | श्री. सुनिल जैतापुरकर | पोलीस निरीक्षक, रायगड | पोलीस अधिक्षक, रायगड |
| २० | श्री. नंदकुमार पवार | हेड कोस्टल प्रोजेक्ट | वनशक्ती |
| | श्री. महेंद्र लांडगे | लिपीक | सहाय्यक संचाल नगररचना भिवंडी नि. मनपा, भिवंडी. |
| २१ | श्री. सुनील सरदार | उप पमुख अभियंता | मुंबई महानगरपालिका |

**बैठकीत अनुपस्थित सदस्य.**

१. वसई-विरार, महानगरपालिका यांचे प्रतिनिधी

३. डॉ. महेश शिंधीकर, पाणथळ तज्ञ

| अ. क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव- बांधकामा प्रकरणी. | • या बाबत मंडळ अधिकारी यांच्यामार्फत सदर FIR दाखल केली आहे परंतु मा. आयुक्त Environment Protection Act नुसार SDO तसेच MPCB च्या अधिकाऱ्यांना FIR आणि चार्जशिट दाखल करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत. | तहसिलदार वसई (जिल्हाधिकारी पालघर) अहवाल प्रलंबित |
| २ | श्री. धिरज परब: - भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत. | • या तक्रारी संदर्भात समितीने मेरी टाईम बोर्ड बांधण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेण्यात आल्या असतील त्या संबंधीचा सर्वे नंबर, झालेल्या खर्चाबाबतचा सविस्तर अहवाल देण्याच्या सूचना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना सांगितले होते.<br>• तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरीटाईम बोर्ड यांच्याकडून या तक्रारीबाबतचे अभिप्राय मागविण्यात आले आहे असे सदस्य सचिवांनी सांगितले.<br>• तसेच या तक्रारी संदर्भात MCZMA यांच्यामार्फत सदर जागेवर काम करण्याच्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत अगर कसे हे तपासण्यास समितीने MCZMA यांच्या प्रतिनिधींनी सांगितले व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि तहसिलदार ठाणे |
| ३ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | | |
| ४ | श्री. स्टॅलीन डी – दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • या तक्रारी संदर्भात SDO मार्फत कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे असे जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या प्रतिनिधींनी सांगितले व या तक्रारीबाबत सॉल्ट पॅन आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.<br>• समितीने या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या प्रतिनिधींना या तक्रारी बाबत ७ दिवसात FIR दाखल करण्याच्या सूचना दिल्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सदस्य सचिवांना देण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| ५ | श्री. स्टॅलिन डी दि.१८.०३.२०१९ Continuous reclamation and construction on Wetlands at Bhayanderpada | • या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांच्या दि. ०६.१२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर बफर झोनने बाधित होणाऱ्या क्षेत्रामध्ये प्रस्तावाअंतर्गत मंजूर केलेल्या अभिन्यास नकाशामधील क्लब हाऊस व आर.जी. चे क्षेत्र सदर बफर झोनने बाधित होते. त्या अनुषंगाने ५० मी. | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | Ghodbunder road by squarefeet Group. | कांदळवनालगत असलेले बफर झोनने बाधित होणारे क्लब हाऊस चे जोत्याचे बांधकाम विकासकांनी निष्कासीत केलेले असून सद्यस्थितीला प्रत्यक्ष जागेवर सदरचे क्षेत्र मोकळया स्वरुपात आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने ठाणे महानगरपालिकेच्या अहवालानुसार सदरची तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | |
| ६ | श्री. सुनिल अगरवाल व श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९ Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal | • समितीने सदर जागेवरील उर्वरित डेब्रिज काढण्याच्या सूचना सिडको आणि SDO पनवेल यांना दिल्या होत्या .<br>• समितीने भेनखल ही पाणथळ जागा असल्याने सदर क्षेत्राचे संरक्षण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कोणतेही विकास कामे होणार नाही याची दक्षता घेण्याच्या दष्टीने संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांच्यामार्फत रिलायन्स यांना सदर जागेवर कोणतेही विकास कामे करु नये याबाबत कळविण्यात यावे असे निर्देश दिले व सदरच जागा एक महिन्यात पुन्हा पुन:स्थापित (Restore) करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• तसेच पाणजे येथे कांदळवन असल्यामुळे सदर ठिकाणी असलेले कांदळवनाचे नुकसान होऊ नये यासाठी पाण्याचे प्रवाह खुले ठेवण्याच्या सूचना समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| ७ | श्री. स्टॅलिन डी :- दि.२७.०६.२०१९ Destruction of Wetland by CIDCO | • या तक्रारी संदर्भात उप विभागीय अधिकारी पनवेल यांच्या दि.०८.११.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार दि.०६.०८.२०१९ रोजी सदर ठिकाणी स्थळ पाहणी करण्यात आली.<br>• सदर ठिकाणी नमुद केलेल्या पनवेल विमानतळाचा संपुर्ण परिसर फिरुन तक्रारीबाबतच्या अनुषंगाने संपुर्ण परिसरात विमानतळासाठी डबर व मुरुम याचा भराव सपाटीकरण केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यासाठी कोणत्याही ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे आढळून आले नाही. तसेच कोणत्याही प्रकारची पक्षांची घरटयांचे मागमुस / अवशेष आढळून आलेले नाही. सदर जागेचे अक्षांश १९.०००४२१ व रेखांश ७३.०८५८३३ असे आहे.<br>• सदर ठिकाणी कांदळवन तोड होत नसल्याने तसेच सदर ठिकाणी पाणथळ जागा नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढावी असे अहवालानुसार सांगितले आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| ८ | **श्री. समिर सुभाष वर्तक आणि मॅकेन्झी डांबरे दि. २२/०२/२१९** भुईगाव | • तलावाची माती बांधावर टाकल्याबाबतचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच रेमंड रॉक करवाले यांच्या विरुध्द SDO वसई यांच्याकडे क्र.८/२०१७ रोजी गुन्हा दाखल केला | जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | येथील पाणथळ जागेवर तिवरांची कत्तल होऊन अतिक्रमणाबाबत शासनाच्या उदासीन धोरणाबाबत बेमुदत उपोषणाबाबत. | आहे.<br>• सदर तक्रारीचा पाठपुरावा करुन SDO वसई यांच्या मार्फत अहवाल सादर करावा असे निर्देश समितीने जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधींना दिले.<br>• सदर ठिकाणी निष्कासनाची कार्यवाही दि. १०.१२.२०१९ रोजी होणार असल्याचे जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या निष्कासनाचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सदस्य सचिवांना देण्याच्या सूचना दिल्या. | |
| ९ | **श्री.धिरज परब यांच्या तक्रारी संदर्भात. दि.** भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेलग्रुपने ( पॅन इंडिया) कट कारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.२०.०२.२०१७ रोजी संयुक्त स्थळपाहणीनुसार सदर ठिकाणी ३ गुंठे जमिनीवरील कांदळवनाचा ऱ्हास झालेल्या ठिकाणी खार जमिनीवर कांदळवनाची पुन: लागवड केली असल्याचे दिसून येत आहे.<br>• ३ गुंठे कांदळवन ऱ्हासासंदर्भात पोलीस विभागाकडून चौकशी करण्यात आलेली होती. तसेच २६ वे न्यायालय बोरीवली यांनी पोलीस विभागाने दिलेल्या अहवालानुसार सदर कंपनीचा प्रत्यक्ष सहभाग नसल्याचे नमुद करुन सदर प्रकरण क वर्गीकरण समरी मंजूरी केली आहे. गुगल नकाशानुसार सदर ठिकाणी CRZ / Wetland चा ऱ्हास झालेला आहे.<br>• सदर प्रकरण उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असून न्यायालयाचे अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे SDO मुंबई उपनगर यांनी सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| १० | **श्री. फ्रान्सिस डिसोजा:-** अध्यक्ष, हरीत नैसर्गिक वेभव बचाव अभियान, भुईगाव ता. वसई<br>(**मौजे भुईगांव सर्वे क्र.** २२०) | • सदर जागेवरील Restoration ची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर जागेचे Restoration करीता सर्वे करुन अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनीधींना दिले. | जिल्हाधिकारी पालघर |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

सदस्य सचिव
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.